# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **02/02/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मानोरा हद्दीतील ग्राम कारली येथील फार्म हाऊस मध्ये शेतकऱ्यांनी ठेवलेले 15 क्विंटल सोयाबीन अज्ञात चोरट्यांनी चोरी केली बाबत गुन्हा दाखल करून ठाणेदार श्री सुनील जाधव व त्यांच्या पथकाने गुन्हयातील आरोपी चा शिताफीने शोध घेऊन दिग्रस येथून तीन आरोपी ताब्यात घेऊन त्यांच्याकडून 75 हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

## फार्महाऊस मधील सोयाबीन चोरीचा पोलिसांनी लावला छडा

➢ डीबी पथकाची धडक कारवाई

➢ मुद्देमालसह चारचाकी वाहन जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मानोरा** ■ तालुक्यातील कार्ली येथील फार्महाऊस मध्ये शेतकऱ्यानी आपल्या शेतातील सोयाबीनचे ३० क्विंटल पोते ठेवले होते.त्यावर रखवालदार असुन रात्रीच्यावेळी चोरट्याने १५ सोयाबीनचे पोते लंपास केल्याची घटना दि.७जानेवारी रोजी रात्री घडली असता डीबी पथकास माहिती मिळताच दिग्रस येथील तीन चोरट्यांनावर धडक कारवाई करीत त्यांना जेरबंद करुन चोरीत वापरलेले चारचाकी वाहन जप्त करण्यात आले.



पोलीसांकडून प्राप्त माहिती नुसार फिर्यादी गणेश आत्माराम गावंडे रा. कार्ली ह.मु.गोकुळनगर मानोरा यांनी फिर्यादी दिली की शेतातील फार्महाऊस येथुन सोयाबीनचे १५ क्विंटल कीमत७५०००हजार रूपयाची चोरी झाल्याची फिर्याद ७ जानेवारी दाखल केली. याप्रकरणी तपास पथकास गुप्त माहिती मिळताच दिग्रस येथील चोरटे असल्याचे निदर्शनास आले.यवतमाळ जिल्हयातील दिग्रस येथे जाऊन मोठ्या शितापीने सापळा रचून तिन्ही आरोपीला ताब्यात घेतले.त्यांनी चोरीकामी वापरण्यात आलेली पांढऱ्या रंगाची टाटा कम्पनीची चारचाकी एमएच२९ बीई ४६२४ यांच्यासह १५ क्विंटल सोयाबीन किंम्मत ७५ हजार जप्त करुन आरोपीला जेरबंद केले.आरोपी आशिष उल्हास राठोड, सैयद रफिक सैयद सलाउद्दीन, सैयद अयूब सैयद सलाउद्दीन रा.मोतीनगर, दिग्रस यांचे विरुध्द कलम ४७१,३८०भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली.७ जानेवारी रोजी चोरी करण्यात आलेल्या चोरट्यांना जेरबंद करण्यात ठाणेदार सुनील जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथक प्रमुख गणेश जाधव, संदीप बरडे, मयूरेश तिवारी, बालाजी महल्ले, बन्सी चव्हाण, पंकज खाडे यांनी चोरीचा छडा लावला.यामुळे शहरात नागरिकामध्ये त्यांच्याप्रती प्रशंसा व्यक्त होत आहे. (श.प्र.)

ePaper देशोन्नती
Wed, 02 February 2022
https://deshonnati.digitaledition.in/c/65985897